# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७११३


क्र:विकाअ/शिक्षण/गु. यादी/२०१५/३०५

दिनांक :- ७/२/२०१५

प्रति,

प्राचार्य,
सर्व विनाअनुदानित औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था.
तसेच Non-AICTE अभ्यासक्रम चालविणा-या संस्था.
(सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे)

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ मधील प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदविका तसेच Non-AICTE अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्यां तपासणीबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील औषधनिर्माणशास्त्र पदविका तसेच Non-AICTE अभ्यासक्रमाचे गुणवत्ता याद्या तपासणी बाबतचा कार्यक्रम सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे **शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती संगणक विभाग** येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून तपासणीचे काम पुर्ण करुन घ्यावयाचे आहे. त्याप्रमाणे या कार्यालयाच्या अधिपत्याखालील संस्थांनी त्यांचे प्रवेश निश्चिती व प्रवेश संकेतस्थळावर अपलोड करण्याचे काम पूर्ण केले आहे. अशा सोबत जोडलेल्या यादीतील सर्व औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्थांनी सोबत दिलेल्या तक्त्यामधील वेळापत्रकाप्रमाणे प्रवेशित गुणवत्ता यादी तपासणीसाठी त्यांना दिलेल्या दिनांकास सर्व मुळ प्रमाणपत्रांसह शैक्षणिक वर्ष २०१४-१५ च्या माहिती पूस्तकामधील पान क्र. ५६ अॅनेक्चर ४ नुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मुळ प्रमाणपत्रे लावून घेण्यांत यावी जेणे करुन तपासणी करतांना सुलभ व जलद तपासणी शक्य होईल. तसेच खाली दिलेल्या सुचनेप्रमाणे गुणवत्ता याद्या तयार करुन या कार्यालयात उपस्थित राहून तपासणीचे काम पूर्ण करुन घ्यावे.

तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादया तीन प्रतीत तयार करुन आपल्या संस्थेचे नांवा समोर दर्शविलेल्या दिनांकास तपासणी अधिका-याकडून गुणवत्ता यादया तपासणीचे काम दिलेल्या मुदतीच्या आत त्वरित पूर्ण करुन घ्यावे. प्रवेशित विद्यार्थ्यांची संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड केलेली प्रवेशित गुणवत्ता यादी सादर करतांना प्रत्येक पानावर प्राचार्याची स्वाक्षरी व स्वाक्षरी करणा-याचे नाव स्पष्टपणे लिहावे वेबसाईटवरील कॅप राऊंड, इंस्टिटयूट लेव्हल (२०% संस्था स्तरावरील प्रवेश), अगेस्ट कॅप राऊड (रिक्त जागांवरील प्रवेश याची (Vacancy Against Cap)), समरी असे सर्व प्रोफार्मा सोबत जोडण्यांत यावेत. तसेच सोबत जोडलेले प्रपत्रामधील माहिती अभ्यासक्रम निहाय सादर करावी. गुणवत्ता यादया तपासणीसंबंधी विविध प्रपत्र या सोबत जोडली असुन सदर सर्व प्रपत्रे डाऊनलोड करुन दिलेल्या प्रपत्रात योग्य ती माहिती प्रत्येक गुणवत्ता यादयासोबत जोडावयाची आहे. गुणवत्ता यादी व्यवस्थितपणे तीन जाडया फाईल मध्ये लावलेल्या असाव्यात. फाईलच्या मुखपृष्ठावर संस्थेबाबत, संस्थेचे नाव, संस्थेचा कोड क्रमांक, पत्ता, दूरध्वनी क्रमांक, संपर्क व्यक्तिचे नाव तथा मोबाईल क्रमांक, अभ्यासक्रम, प्रवेश क्षमता, झालेले प्रवेश, रिक्त जागा इत्यादी संकेतस्थळावर दर्शविल्याप्रमाणे माहिती असावी. तसेच फाईलवर अणुक्रमणिका व पान क्रमांक असावेत. तसेच AICTE ची परवानगी /PCI चे मान्यता पत्र, शासन मान्यता पत्र, संचालनालयाचे मान्यता पत्र, अभ्यासक्रम निहाय गुणवत्ता याद्या, मुदत ठेव कागदपत्र व ईतर महत्वाचे कागदपत्रावर फ्लॅग लावावेत व फ्लॅगवर त्या कागदपत्राची थोडक्यात माहीती लिहावी. जसे AICTE मान्यता / DTE मान्यता / मुदतठेव ईत्यादी, जेणे करुण गुणवत्ता याद्या तपासणीचे काम जलद गतीने होईल. गुणवत्ता याद्या तयार करण्यासंदर्भात काही अडचणी आल्यास तात्काळ या कार्यालयास संपर्क करावा. तसेच **गुणवत्ता याद्यांची विहित कालावधीत तपासणी करुन घेण्याची संपुर्ण जबाबदारी आपली आहे,** याची नोंद घ्यावी. गुणवत्ता यादी तपासणीकरीता आवश्यक सर्व मुळ कागदपत्रासह (शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता AICTE, शासन संचालनालय मान्यता, T.C. गुणपत्रिका, जातीचा दाखला) या कार्यालयात जाणकार प्राध्यापक/कर्मचारी यांना प्रतिनियुक्त करावे.

ज्या संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम / सुरु असलेल्या अभ्यासक्रमामध्ये वाढ यास मंजूरी मिळालेली असेल तर त्याबाबत या कार्यालयाची तपासणी शुल्क भरल्याबाबत कागदपत्रे वाढीव अभ्यासक्रमाचे ठेव ठेवल्याची पावती व अंतिम मान्यता प्रमाणपत्रे इत्यादी सोबत जोडण्यांत यावीत. नवीन संस्थांनी त्यांना मिळालेली एआयसीटीई / संचालक / महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेची पत्रे सोबत जोडण्यांत यावी. मुदत ठेवीची पावती या कार्यालयास भरलेली तपासणी शुल्काची पावती सोबत जोडण्यात यावीत.

तसेच ज्या संस्थांनी शै. व. २०१४-१५ करीता ज्या पदविका औषधनिर्माणशास्त्र/Non-AICTE अभ्यासक्रमांच्या संस्थांना नवीन पदविका अभ्यासक्रम प्रवेश क्षमता वाढ इ बाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद तसेच शासनाची मान्यता प्राप्त झालेली आहे, तथापि संबंधीत संस्थांनी सदर अभ्यासक्रमास तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांची अंतिम मान्यता घेतलेली नाही. अशा अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये विद्यार्थी प्रवेश केले असल्यास सदर प्रवेश अनधिकृत प्रवेश का समजण्यात येऊ नये व अनधिकृत प्रवेशाबाबत नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही का करण्यात येऊ नये याबाबतचे प्रमाणपत्र सदर गुणवत्ता यादीसोबत सादर करावे. तसेच गुणवत्ता यादीची तपासणीत विद्यार्थी अपात्र ठरल्यामुळे प्रवेश रद्द झाल्यास त्याचे नांव संकेतस्थळावर असणा-या यादीतून वगळून परत यादी सादर करावी.

तसेच फी रिफंड बाबत काही प्रकरणाबाबत आपणाकडे या कार्यालयाव्दारे विद्यार्थ्यांनी केलेल्या तक्रारी प्रलंबित असतील तर त्याची माहिती सोबत घेवून यावी. सदर माहिती सादर केली असल्यास ती सुध्दा घेवून यावी तसेच ज्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये या कार्यालयाव्दारा ईबीसी रक्कम प्राप्त झालेली आहे अशा संस्थांनी उपयोगीता प्रमाणपत्र सादर करावी त्याशिवाय गुणवत्ता यादी तपासली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच गुणवत्ता यादया तयार करतांना पुढील बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. अ) गुणवत्ता यादया तीन प्रतीत असाव्यात ब) प्रत्येक गुणवत्ता यादी तथा कागदपत्रे स्वतंत्र नस्तीमध्ये व्यवस्थितपणे टाचलेली असावी क) गुणवत्ता यादीतील कागदपत्रे पुढील प्रमाणे क्रमवारी टाचलेली असावीत. प्रत्येक पानावर पान नंबर टाकलेला असावा. तसेच अनुक्रमणिका जोडलेली असावी १) तपासणी अधिका-यांचे प्रमाणपत्र २) जनरल मेरिट लिस्ट (अभ्यासक्रमनिहाय) ३) प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी (अभ्यासक्रमनिहाय) ४) सांख्यिकी माहिती (अभ्यासक्रमनिहाय) ५) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली , फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली, शासन तथा संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे मान्यतेबाबतची कागदपत्रे ६) गुणवत्ता यादी संबंधीत इतर आवश्यक कागदपत्रे (उदा.जाहिरात, नोटीस इत्यादी) ७) महाराष्ट्र राज्याबाहेरील प्रथम तथा इतर कोणत्याही वर्षात संस्थेत थेट प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांचे बाबत मंडळाचे विहीत विभागीय कार्यालयाकडुन संस्थेने समकक्षता प्रमाणपत्र मिळविले आहे किंवा नाही ८) प्रवेश नियमावलीप्रमाणे प्रवेशासाठी मागासवर्गीयांकरीता आरक्षण, मुलींसाठी ३० टक्के प्रवेश इ. राखीव प्रमाणपत्राप्रमाणे असने आवश्यक आहे. तसेच त्रुटी असलेल्या गुणवत्ता यादया, त्रुटी पुर्ण करुनच दोन दिवसाचे आत या कार्यालयास सादर कराव्यात अन्यथा भविष्यात होणा-या परिणामास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल, याची नोंद घ्यावी. तसेच रिझल्ट ॲन्ड कन्सिशन मॅनेजमेंट बाबतची माहीती भरल्याबाबतचे कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे**

(डी. एन. शिंगाडे)
प्र.सहसंचालक तंत्र शिक्षण,
अमरावती.

प्रत :- १) मा.संचालक, तंत्र शिक्षण,म.रा.,मुंबई यांना माहिती करिता सादर.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

**शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता औषधनिर्माणशास्त्र पदविका तसेच Non-AICTE अभ्यासक्रमाच्या**

प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादी तपासणी करावयाच्या संस्थांची यादी.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | तपासणी दिनांक |
|---|---|---|
| १ | अनुराधा कॉलेज ऑफ फॉर्मसी, चिखली, बुलढाणा | ९/२/२०१५ |
| २ | इंदिरा बहु शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ फॉर्मसी, मलकापुर | ९/२/२०१५ |
| ३ | राजश्री शाहु कॉलेज ऑफ फॉर्मसी, बुलढाणा | ९/२/२०१५ |
| ४ | रामरावजी गावंडे इन्स्टिटयुट ऑफ फॉर्मसी, अकोला | ९/२/२०१५ |
| ५ | कॉलेज ऑफ फॉर्मसी, देगाव, रिसोड, वाशिम | ९/२/२०१५ |
| ६ | विदर्भ इन्स्टिटयुट ऑफ फॉर्मसी, वाशिम. | ९/२/२०१५ |
| ७ | मातोश्री कॉलेज ऑफ फॉर्मसी, मेहकर, जि.बुलढाणा. | ९/२/२०१५ |
| ८ | इन्स्टिटयुट ऑफ फॉर्मसी, मारेगाव, जि. यवतमाळ | ९/२/२०१५ |
| ९ | इन्स्टिटयुट ऑफ फॉर्मसी, वणी, यवतमाळ | १०/२/२०१५ |
| १० | नवसंजीवनी शिक्षण मंडळाचे कॉलेज ऑफ फॉर्मसी, दारव्हा | १० ९/२/२०१५ |
| ११ | ईश्वर देशमुख इन्स्टिटयुट ऑफ फॉर्मसी, दिग्रस, जि. यवतमाळ | १०/२/२०१५ |
| १२ | मनोहरराव नाईक इन्स्टिटयुट ऑफ फॉर्मसी, उमरखेड | १०/२/२०१५ |
| १३ | पी. वाधवानी इन्स्टिटयुट ऑफ फॉर्मसी, यवतमाळ | १०/२/२०१५ |
| १४ | जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे इन्स्टिटयुट ऑफ फॉर्मसी, पुसद. | १०/२/२०१५ |
| **१५** | **सुरु असलेल्या सर्व Non-AICTE संस्था.** | ९/२/२०१५ ते १०/२/२०१५ |

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.